www.rajdand.com
सातारा, सोमवार
08.01.2024
पृष्ठ : ४ । मुल्य : ४ । मार्गशीर्ष कृ.२७
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

## वेण्णा तलावात विष्ठा महाबळेश्वरला संसर्ग



(पान ३ वर)

### जरांगे पाटील यांच्या 'मुंबईत येणारच' घोषणेनंतर अजित पवारांचा टोला

# कायदा हातात घ्याल तर, गय करणार नाही - अजित पवार

**मुंबई: मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या प्रश्नासाठी २० जानेवारी रोजी मुंबईत येणारच अशी भूमिका घेतलेली आहे. त्यावरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी टोला लगावला. संविधानाने घालून दिलेल्या चौकटीचा आदर झाला पाहीजे. जर कायदा हातात घेण्याचा प्रयत्न कुणी केला, तर त्याचा मुलाहिजा ठेवायचा नाही. कायद्यापेक्षा कुणीही श्रेष्ठ नाही, असेही ते म्हणाले्**





महाराष्ट्रात सध्या आरक्षणाच्या मुद्द्यावरून चाललेल्या आरोप-प्रत्यारोपावर त्यांनी भाष्य केले. जितेंद्र आव्हाड यांचे नाव न घेता त्यांनी केलेल्या विधानावर टीका केली. वाचाळविरांची संख्या वाढली आहे. काहीजण विकासाचे बोलण्यापेक्षा नको त्या विषयावर बोलत आहेत, असे अजित पवार म्हणाले.

मराठा आरक्षणाच्या बाबत बोलत असताना अजित पवार म्हणाले, ह्ममराठा समाजाला आरक्षण मिळालं पाहीजे, यात कुणाचंच दुमत नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माझ्यात एकमत आहे. परंतु आज राज्यात ६२ टक्के आरक्षण आधीपासूनच आहे. आता आणखी आरक्षण देण्यासाठी कायदेशीर मार्ग तपासावे लागतील. पण काही लोक टोकाची भाषा वापरत आहेत. मुंबईला येण्यासंबंधी घोषणा करत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला संविधान देऊन ७५ वर्ष झाली. आजही त्याच संविधानाच्या आधारावर देश मार्गक्रमण करत आहे. संविधानाने घालून दिलेल्या चौकटीचा आदर झाला पाहीजे. जर कायदा हातात घेण्याचा प्रयत्न कुणी केला, तर त्याचा मुलाहिजा ठेवायचा नाही. कायद्यापेक्षा कुणीही श्रेष्ठ नाही, हेदेखील लक्षात ठेवा.

अजित पवार पुढे म्हणाले की, राज्यातील वेगवेगळे जातसमुदाय आरक्षण मागत आहेत. धनगर समाज एसटीमधून आरक्षण मागतोय. मात्र आदिवासी समाजाचीही मागणी आहे की, त्यांच्या आरक्षणाला धक्का लागता कामा नये. राज्यातील सर्व वंचित, दुर्बल समाजाला इतर समाजांच्या बरोबरीने आणायचे आहे. ठाणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जंगले आहेत. इथेही आदिवासी समाज राहतो. त्यांच्या विकासासाठी विविध प्रकल्पांचे काम चालू आहे. सार समाजाच्या कल्याणासाठी, लोकांच्या अडचणी सोडविण्यासाठी आपण सरकारमध्ये गेलो आहोत. सरकारमध्ये जाताना आमचा वैयक्तिक स्वार्थ नव्हता. महायुतीमधील पक्षांची विचारधारा वेगळी असली तरी महाराष्ट्राच्या विकासासाठी आम्ही एकत्र आलो आहोत, असेही ते म्हणाले.

मागे आम्ही शिवसेनेबरोबर सरकार स्थापन केले होते. शिवसेनेबरोबर कोरोनाच्या काळात काम करत होतो. त्यावेळी मी सकाळीच ८ वाजता मंत्रालयात जाऊन बसायचो. काही जण म्हटले, कोरोना झाला तर मराल आणि वर जाल. पण मी म्हटले, मेलो तर मेलो. पण लोकांचे प्रश्न सुटले पाहीजेत. मंत्रालयच उघडले नाही, तर प्रशासन ठप्प होईल. चांद्यापासून बांद्यापर्यंतची यंत्रणा हलणार नाही. यंत्रणा हलविण्याची ताकद राज्यकर्त्यांमध्ये असावी लागते, असे विधान अजित पवार यांनी केले.

## लोकसभा निवडणूक: मुंबईत लवकरच महायुतीचा महामेळावा

**मुंबई :** मुंबईत लवकर महायुतीचा महामेळावा पार पडणार आहे. 14 जानेवारीला एकाच जिल्ह्यात 35 ठिकाणी महायुतीचे मेळावे होणार आहेत. लोकसभा निवडणुकीच्या पाश्वर्भूमीवर महायुतीचा महामेळावा पार पडणार आहे. फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

लोकसभा निवडणुकीच्या घोषणेपूवी महायुती कार्यकर्त्यांमध्ये महामेळाव्यातून ऊर्जा भरणार आहे.

मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज पार्क मैदान किंवा वांद्रे बीकेसी येथे करण्याचे नियोजन सुरु आहे. फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस हा महामेळावा घ्यायचे महायुतीचे ठरले आहे. नुकतीच महायुतीतील सर्व घटक पक्षांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. त्यात जानेवारी महिन्यामध्ये राज्यात ठिकठिकाणी जिल्हास्तरीय तालुकास्तरीय मेळाव्या आयोजित करण्यात आलेले आहेत. या 14 तारखेला एकाच जिल्ह्यात 35 ठिकाणी महायुतीचे मेळावे होणार आहेत. यात घटक पक्षाचे आणि महायुतीचे प्रमुख नेते हे आपल्या कार्यक्षेत्रात उपस्थित राहणार आहेत. त्यात हे सर्व मिळावे पार पडल्यानंतर मुंबईत एक महामेळावा करण्याचे महायुतीने ठरवले आहे. फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या दोन आठवड्यात दुसऱ्या टप्प्यामध्ये मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सहा महसूल विभागामध्ये जाहीर मेळावे होणार आहेत.



भाजप आणि महायुतीतील मित्रपक्ष कामाला लागले आहेत. १४ जानेवारीपासून सर्व जिल्ह्यांमध्ये महायुतीचे मेळावे घेण्यात येणार आहेत. जिल्हा, तालुका आणि बूथ पातळीवर मेळावे होणार आहेत. फेब्रुवारीमध्ये एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचे जाहीर मेळावे होणार आहेत. घटक पक्षाचे नेते देखील या मेळाव्याला हजर असणार आहेत.

महायुतीचे जागावाटप रखडले आहे. महायुतीच्या जागावाटपाची चर्चा सध्या सुरू आहे. जागा वाटपाबाबत रोज नवनवीन दावे करण्यात येत आहेत. कोणाला किती आणि कोणत्या जागा मिळतील याबाबत तर्क लढवले जात आहेत. जागा वाटपाचा फार्म्युला अद्याप ठरला नसला तरी अधूनमधून सगळ्याच पक्षांचे नेते जागांवर दावे-प्रतिदावे करत आहेत. महायुतीचा जागावाटपाचा तिढा सोडवण्यासाठी नेते दिल्लीला देखील जाणार असल्याची माहिती आहे.

## खासदार भावना गवळींच्या अडचणीत वाढ

**वाशीम :** ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर वाशीम -यवतमाळ लोकसभा मतदार संघाच्या खासदार भावना गवळी अडचणीत सापडल्या आहेत. सरकारमध्ये सहभागी असतानाही शिवसेना शिंदे गटाच्या खासदार भावना गवळी यांच्या संस्थेचे खाते आयकर विभागाने गोठवले असल्याची माहिती समोर येत आहे. त्यातच मुख्यमंत्री शिंदे यांच्या शिवसंकल्प अभियानमधून अचानक यवतमाळ वाशीम लोकसभेचा कार्यकर्ता मेळावा रद्द केल्याने लोकसभेची जागा भाजपच्या पारड्यात तर गेली नाही ना? यावरून शंका व्यक्त केली जात आहे.खासदार भावना गवळी यांच्या महिला उत्कर्ष प्रतिष्ठान संस्थेबाबत २९ डिसेंबर रोजी आयकर विभागाने भावना गवळी यांना नोटीस दिली होती. आयकर विभागाने पाच जानेवारीपर्यंत भावना गवळी यांना उत्तर मागितले होते. मात्र भावना गवळी प्रत्यक्ष तिथे उपस्थित राहिल्या नाहीत. त्यांनी प्रतिनिधी पाठवून नोटीसला उत्तर दिल्याने आयकर विभागाचे समाधान झाले नसल्याने आयकर विभागाने अखेर महिला उत्कर्ष प्रतिष्ठान या संस्थेची खाती गोठवली असल्याची माहिती समोर येत आहे.

## मालदीवच्या मंत्र्याचे भारतविरोधी वक्तव्य; हजारो भारतीयांनी रद्द केली मालदीव टूर



**नवी दिल्ली:** भारत-मालदीव संबंध सध्या ताणले गेल्याचे दिसत आहे. यातच आता बायकॉट मालदीव सोशल मीडियावर ट्रेंड करू लागले आह. देशातील हजारो लोक #BoycottMaldives लिहून आपला विरोध व्यक्त करत आहेत. हे लोक मालदीवच्या नेत्यांनी भारताविरोधात केलल्या वक्तव्यामुळे भडकले आहेत. यातच भारत सरकारनेही मालदीवच्या मंत्र्याने केलेल्या वक्तव्यावर चिंता व्यक्त केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी नुकतेच लक्षद्वीपला गेले होते. त्यांच्या या दौऱ्याचे फोटो सोशल मीडियावर जबरदस्त व्हायरल झाले आणि होत आहेत. एवढेच नाही, तर स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना लक्षद्वीपला भेट देण्याचे आवाहन केले आहे. यानंतर भारताच्या लक्षद्वीप आणि मालदीव यांच्या समुद्र आणि समुद्र किनाऱ्यांच्या सौंदर्यासंदर्भात तुलना सुरू झाली आहे. महत्वाचे म्हणजे, पाहता पाहता ही तुलना एवढी वाढली की तिकडे मालदीव सरकारही टेन्शनमध्ये आले. यानंतर गांगरून गेलेल्या मालदीवच्या एका मंत्र्याने भारतविरोधी पोस्ट केली आणि यावरून वाद निर्माण झाला.

यासंदर्भात मरियम शिउना यांनीही अपमानास्पद वक्तव्य केले. मालदीवच्या नव्या राष्ट्रपतींचे चीन प्रेम कुणापासूनही लपलेले नाही. यातच मालदीवचे नेते अब्दुल्ला मोहजुम माजिद यांनी सोशल मीडियावर एक एक पोस्ट शेअर केली, यात त्यांनी म्हटले आहे की, 'मालदीवच्या पर्यटनाला लक्ष्य करण्यासाठी मी भारतीय पर्यटनाला शुभेच्छा देतो. मात्र भारताला आमच्या बीच पर्यटनापासून कडवी टक्कर मिळेल. आमचे केवळ रिसॉर्ट इंफ्रास्ट्रक्चरच यांच्या संपूर्ण इंफ्रास्ट्रक्चरहून अधिक आहे.' या पोस्टमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही टॅग करण्यात आले आहे.

## पुण्यातील शेकडो मनसे कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**पुणे :** एकीकडे स्वतः राज ठाकरे आणि अमित ठाकरे यांनी पुणे मनसेमध्ये लक्ष घातले आहे, कार्यकर्त्यांची आणि पक्षाची बांधणी देखील सुरू केली आहे. मात्र असे असताना देखील आता भाजपने मनसेला मोठा धक्का दिला आहे. स्वतः राज आणि अमित ठाकरे हे पुण्यातील मनसे वाढवत असताना भाजपने मनसेतील एक मोठी फळी भाजपत गेली आहे.

मनसेचे पदाधिकारी मंदार बलकवडे यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

भाजपचा पुणे लोकसभा मतदारसंघातील सुपर वॉरियसशी संवाद कार्यक्रमानंतर बलकवडे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.



पुणे लोकसभेचे प्रभारी म्हणून राज ठाकरे यांनी अमित ठाकरे यांच्यावर जबाबदारी सोपवली होती. त्यानंतर अमित ठाकरे यांनी सातत्याने पुणे दौरे करत मनसेची पक्षबांधणी करण्यावर भर दिला. एकीकडे अमित ठाकरे यांच्या उपस्थितीत मनसेमध्ये पक्षप्रवेश सुरू असताना आता पुणे मनसेला मोठा धक्का दिलेला आहे. मनसेचे पदाधिकारी असलेले मंदार बलकवडे हे आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपात डेरेदाखल झाले आहेत. त्यामुळे मनसेचा मिशन पुणे लोकसभेला मोठा धक्का बसला आहे.

पुणे लोकसभा मतदारसंघात भाजपाचा विजय होईल. ५१ टक्के मते घेऊन महायुतीचाच उमेदवार जिंकेल. गेल्या वेळेपेक्षाही मोठा विजय पुण्यात होईल, अशी योजना आम्ही तयार केली आहे, असे यावेळी चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.


पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्त्वात राज्यात ४५ प्लस लोकसभा व २२५ प्लस विधानसभा जागांवर महायुतीचा महाविजय साकारणार आहे. यात भाजपाचे सुपर वॉरियर्स विजयाचे शिलेदार ठरतील.

संक्रांतीच्या पावनपर्वावर राज्यात १४ तारखेपासून प्रत्येक जिल्ह्यात महायुतीचे मेळावे होणार आहेत. हे सर्व जिल्हास्तरीय मेळावे आहेत. फेब्रुवारी महिन्यात विभागीय मेळावे आहेत. मार्च महिन्यात राज्याचा मेळावा होईल. महायुती बूथस्तरापर्यंत मतदान केंद्रस्तरापर्यंत तालुकास्तरापर्यंत एकत्रित आणि एकजुटीने जनतेपर्यंत जाईल.

# कोल्हापूरच्या जागेसाठी इच्छुक तीन पक्ष, उमेदवार मात्र एकच

**कोल्हापूर:** 'कोल्हापूर लोकसभेची जागा आम्हालाच मिळावी' असा दावा महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना या तिन्ही पक्षांनी केला आहे, मात्र सर्वच पक्षांचे उमेदवारीसाठी लक्ष मात्र श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांच्यावरच असल्याचे दिसत आहे. त्यांनी मैदानात उतरण्यास नकार दिला असतानाही त्यांच्याकडे आग्रह धरतानाच अचानक माजी खासदार संभाजीराजे यांनीही मैदानात उतरण्याचे संकेत दिले आहेत.

सध्या राज्यात महाविकास आघाडी अंतर्गत जागावाटप आणि उमेदवारीबाबत चर्चा-बैठका सुरू आहेत. याच पाश्वर्भूमीवर कोल्हापूरच्या जागेवर तिन्ही पक्षाचे नेते दावा करत आहेत. यापूवी ही जागा शिवसेनेने लढवल्याने आणि निवडूनही आल्याने आमचा नैसर्गिक हक्क असल्याचे शिवसेना ठाकरे गटाचे मत आहे. हीच स्थिती राष्ट्रवादी शरद पवार गटाची



आहे. यामुळे या दोघांचे पारडे जड असतानाच या मतदारसंघात तीन-तीन विधानसभा आणि दोन विधान परिषदेचे आमदार काँग्रेसचे असल्याने आणि ताकद चांगली असल्याने ही जागा हाताच्या चिन्हावर लढवण्याची इच्छा नेते व्यक्त करत आहेत. प्रत्येक पक्षाकडे तीन ते चार इच्छुक उमेदवारही आहेत. उमेदवारी मिळाल्यास लढण्याची तयारी ठेवत व्ही. बी. पाटील, चेतन नरके, बाजीराव खाडे, संजय घाटगे हे तयारीलाही लागले आहेत.

या सर्व पाश्वर्भूमीवर सध्या तीनही पक्षांचे उमेदवारीसाठी लक्ष मात्र श्रीमंत शाहू महाराज छत्रपती असल्याचे दिसत आहे. महाराजांनी धुमधडाक्यात साजरा केलेला अमृत महोत्सवी वाढदिवस, मनोज जरांगे पाटील यांच्या सभेला तसेच राष्ट्रवादी पक्षाच्या मेळाव्यास, अंतरवाली सराटी गावात लावलेली उपस्थिती, शेतकरी संघटना आणि कारखानदार यांच्यातील संघर्षा वेळी थेट रस्त्यावर उतरत समझोता घडवून आणण्याचा केलेला प्रयत्न यासह अन्य काही घटनांमुळे महाराज लोकसभेच्या मैदानात उतरतील अशी अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यासाठी त्यांच्या मागे उमेदवारीसाठी आग्रह सुरू आहे.

कोल्हापूरची जागा तीन पैकी कोणत्याही पक्षाला मिळाली तरी तिघांची पहिली पसंती ही श्रीमंत शाहू महाराज छत्रपती आहेत. काँग्रेस आणि राष्ट्रवादीला ते प्राधान्य देण्याची शक्यता अधिक आहे. जागा कोणत्याही परिस्थितीत शिवसेनेकडेच राहिली तर ते सेनेच्या चिन्हावरही मैदानात ते उतरू शकतील. सद्यस्थितीला या मतदारसंघात काँग्रेसची ताकद अधिक असल्यामुळे कदाचित या पक्षाचा विचार होऊ शकतो. मात्र, जागा वाटपात शिवसेना या जागेसाठी आग्रही आहे. कोणत्या चिन्हावर निवडणूक अधिक सोपी जाईल यावरच पक्ष ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

शाहू महाराजांच्या नावाबाबत चर्चा सुरू असताना अचानक माजी खासदार संभाजीराजे यांनीही शड्डू ठोकला आहे. २००९ मध्ये झालेला पराभव जिव्हारी लागल्याने ते आता पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत तशी स्पष्ट घोषणा त्यांनी कोल्हापुरात केली आहे.

श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांचा नकार कायम राहिला तर उद्योगपती व्ही. बी. पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याची दाट चिन्हे आहेत. काँग्रेस, शिवसेना आणि राष्ट्रवादी या तिन्ही पक्षातील नेत्यांची असलेले त्यांचे संबंध, गेले अनेक वर्षे क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, बांधकाम यासह विविध क्षेत्रातील त्यांचे काम उल्लेखनीय आहे. ते अनेक संघटना आणि संस्थावर पदाधिकारी, संचालक आहेत. यामुळे त्या संबंधांचा उपयोग चांगला होऊ शकतो. महाराज यांच्याशी त्यांचे अतिशय जवळचे संबंध आहेत. त्यामुळे त्यांच्याकडूनही पाटील यांचेच नाव पुढे येऊ शकते. ते पवार कुटुंबाशी निष्ठावंत असल्याने राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार हे त्यांच्या नावाचा आग्रह धरण्याची शक्यता आहे. त्यामुळे गेले वर्षभर पाटील विविध माध्यमातून उमेदवारीसाठी प्रयत्न करत आहेत. त्यांनी संपकही वाढवला आहे.

सध्या पक्षापेक्षा उमेदवार महत्त्वाचा असल्याने कोणत्याही पक्षाची उमेदवारी त्यांना मिळू शकते. यामुळे व्ही. बी. पाटील हे देखील राष्ट्रवादी अथवा काँग्रेसचे उमेदवार होण्याची चिन्हे आहेत.

एकीकडे उमेदवारासाठी नकार देत असताना गेल्या तीन-चार महिन्यात ज्या पद्धतीने वाड्यावर हालचाली सुरू आहेत, त्यातून प्रचंड आग्रहानंतर महाराज मैदानात उतरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. रविवारी 7 जानेवारी रोजी त्यांचा वाढदिवस आहे. यानिमित्ताने त्यांच्या उमेदवारीबाबत जोरदार चर्चा सुरू झाली आहे, मात्र, त्यांनी स्पष्ट नकारच दिला तर पर्यायी उमेदवार म्हणून व्ही. बी. पाटील, चेतन नरके आणि संजय घाटगे या तीन नावाबाबत निर्णय होऊ शकतो. तशा हालचाली सुरू झाल्या आहेत.

## महाविकास आघाडीसाठी लोकसभा निवडणूक सोपी होणार नाही-देवरा

**मुंबई :** महाविकास आघाडीसाठी लोकसभा निवडणूक सोपी होणार नाही. कुणीही सार्वजनिक वक्तव्यं किंवा दावे करू नये, असा इशारा काँग्रेस नेते मिलिंद देवरांनी ठाकरे गटातील नेत्यांना इशारा झाला आहे. ठाकरे गटाने दावा केल्यास काँग्रेसही दावा करून उमेदवार निश्चित करेल, असेही मिलिंद देवरा म्हणाले. एका वृत्तवाहिनीशी बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले आहे.

मिलिंद देवरा म्हणाले, माझे मतदार कार्यकर्ते समर्थक मला सकाळपासून कॉल करत आहेत. महाविकास आघाडीतील एक घटक पक्ष दक्षिण मुंबईच्या जागेसाठी एकतर्फी दावा करत आहे, त्यामुळे तुमची चिंता वाढणे साहजिक आहे. मला कुठल्याही प्रकारे वाद वाढवायचा नाही किंवा करायचा नाही. त्यांच्या एका प्रवक्त्याने मागील आठवड्यात काँग्रेस पक्षाला शून्यापासून सुरुवात करायला सांगितली. काल गिरगावच्या सभेत पुन्हा एकदा दक्षिण मुंबई लोकसभा जागेसाठी त्या घटक पक्षाकडून दावा करण्यात आला. मागील ५०



वर्षापासून दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघ हा काँग्रेसकडे आहे. देवरा परिवार हा मतदारसंघ लढवत आला आहे. खासदार असो वा नसो लोकांची कामे दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघात केली आहेत. कुठल्याही लाटेत आम्ही निवडून आलेलो नाही. काम आणि नात्यांनी आम्ही हा लोकसभा मतदारसंघ आतापर्यंत जिंकला आहे, असेही मिलिंद देवरा म्हणाले.

मिलिंद देवरा म्हणाले, जर एखादा पक्ष औपचारिक चर्चेआधी जर दावे करत असेल तर काँग्रेससुद्धा जागांवर दावा करू शकते आणि उमेदवार देऊ शकते. मला वाटतं हा संदेश दिल्ली आणि मुंबईतील काही महत्त्वाच्या लोकांपर्यंत पोहोचेल.

# निवडणुकीआधी अंदाज अपना अपना

भाजपच्या जागावाटपाला २२ जानेवारीनंतरच वेग येईल. तोवर काँग्रेसची न्याय यात्रा पुढे गेलेली असेल आणि ह्यइंडियाह्लचीही बोलणी सुरू झालेली असतील. सध्या मात्र चाचपणीच सुरू आहे..

दिल्लीतील प्रसारमाध्यमांमधून प्रसारित होत असलेल्या राम मंदिराच्या उद्घाटनाच्या विविधांगी वृत्तांमुळे देशात बाकी काहीही घडत नसल्याचा भास निर्माण होऊ शकतो हे खरे; पण आगामी लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरू झालेली आहे. काँग्रेस आणि भाजपच्या मुख्यालयांमध्ये एकामागून एक बैठका होत आहेत. वेगवेगळया राज्यांमध्ये नवी राजकीय गणिते मांडली जात आहेत. या सगळ्या घडामोडींवर २२ जानेवारीनंतर शिक्कामोर्तब होईल. रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा झाल्यावर खरा धूमधडाका पाहायला मिळेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी नुकतेच दक्षिणेत फेरी मारून आलेले आहेत. केरळ, तमिळनाडू, लक्षद्वीप असा दौरा करून उत्तरेला दक्षिणेशी जोडण्याचा प्रयत्न केलेला आहे. भाजपने विरोधकांच्या ह्यइंडियाह्ल महाआघाडीवर उत्तर-दक्षिण राज्यांमध्ये आडवी फूट पाडण्याचा आरोप केलेला होता. उत्तरेत राम मंदिराचा मुद्दा राजकीय केला असताना दक्षिणेत ह्यसेन्गोलह्ल राजदंड नव्या संसदेत बसवून तमिळ संस्कृतीशी नाळ जोडण्याचा प्रयत्न झालेला होता. वाराणसीमध्ये ह्यकाशी-तमिळ संगममह्लचे सलग दुसरे संमेलन आयोजित केले गेले होते. या पार्श्वभूमीवर मोदींची दक्षिणवारी महत्त्वाची ठरते. मोदींच्या ह्यचलो दक्षिणह्ल प्रयोगामध्ये कर्नाटकच्या पराभवानंतर अडथळे आले असले तरी, दक्षिणेत धडक मारण्याचे भाजपने थांबवलेले नाही. २०२४च्या लोकसभा निवडणुकीत केरळ, तमिळनाडू, कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेश या पाचही राज्यांमध्ये भाजपला अपवादात्मक जागा जिंकता येईल.

दक्षिणेतील आंध्र प्रदेशात काँग्रेस सर्वात कमकुवत आहे. ह्यवायएसआर तेलंगणाह्ल काँग्रेसमध्ये विलीन करून वाय. एस. शर्मिला यांनी काँग्रेसला आधार मिळवून दिला आहे. इथे जगनमोहन रेड्डी यांच्या ह्यवायएसआर काँग्रेसह्लविरोधात काँग्रेसला एकटयाने लढता येणार नाही. लोकसभा निवडणुकीत पवन कल्याण यांचा ह्यजनसेना पक्षह्ल भाजपसोबत जाणार असेल तर तेलुगु देसमला काँग्रेसशी आघाडी करता येऊ शकेल. पण चंद्राबाबू ह्यइंडियाह्लमध्ये सामील होणार की नाही हे अजून स्पष्ट झालेले नाही. ही आघाडी झाली तर काँग्रेसला कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशमध्ये जागा वाढवण्याची संधी असेल. लोकसभा निवडणुकीनंतर ह्यभारत राष्ट्र समितीह्ल कदाचित ह्यइंडियाह्लच्या मांडीला मांडी लावून बसू शकेल. ह्यवायएसआर काँग्रेसह्ल मात्र भाजप आघाडीकडे झुकण्याची शक्यता दिसते. तेलंगणामध्ये ह्यभारत राष्ट्र समितीह्लच्या पराभवामुळे महाराष्ट्रात महाविकास आघाडीविरोधात तिसरी आघाडी उघडण्याचा भाजपच्या प्रयत्नाला खीळ बसली. त्याचा फायदा विरोधकांना लोकसभा निवडणुकीत होऊ शकतो.

दक्षिणेमध्ये नव्या राजकीय आघाडीची शक्यता निर्माण झाली असताना दिल्लीमध्ये काँग्रेस आणि भाजपचा ह्यअंदाज अपना अपनाह्ल सुरू आहे. दोन्ही पक्ष आपापली रणनीती आखून कामाला लागले आहेत. दोन आठवडयांपूवी मोदींनी नेते-पदाधिका[ ]यांची दोन दिवसांची बैठक घेऊन लोकसभा निवडणुकीचा अजेंडा दिलेला असून त्याची तंतोतंत अंमलबजावणीही केली जात आहे. प्रत्यक्ष निवडणुकीच्या प्रचाराआधी राम मंदिराचा आधार घेत देशभर भाजपसाठी वातावरण निमिती केली जाईल. मंदिराच्या उद्घाटनाचा सोहळा सर्व लोकसभा मतदारसंघांत लोकांना प्रत्यक्ष पाहता येईल. मोदींची ह्यमन की बातह्ल जशी घोळक्याने ऐकली जाते तसाच हा सोहळाही पाहिला जाईल. रामभक्तांना अयोध्येत जाण्यासाठी भाजपचे कार्यकर्ते सहकार्य करणार आहेत. भाविकांच्या अयोध्यावारीचा भाजपशी थेट संबंध नसल्याचे दाखवले जात असले तरी, वेगवेगळया संस्था-संघटना-मंडळांच्या माध्यमातून भाजपकडून भाविकांची वारी घडवून आणली जाईल. हा टप्पा आचारसंहिता लागू होईपर्यंत चालू शकेल.

भाजप नेहमीच निवडणुकांच्या मूडमध्ये असल्यामुळे त्यांना वेगळी तयारी करावी लागत नाही; फक्त प्राधान्यक्रम बदलावे लागतात. भाजपने कार्यकर्त्यांना ह्यअगली बार चारसो पारह्लचे लक्ष्य दिलेले आहे. त्यासाठी नव्या मतदारांशी संपर्क साधणे आणि केंद्राच्या योजनांचा अधिकाधिक विस्तार करणे या दोन बाबींकडे लक्ष केंद्रित करण्याची सूचना केलेली आहे. त्यानुसार बूथ स्तरावर संपर्क यंत्रणा, फीडबॅक, फॉलो-अप हे ठरलेले टप्पे पार पाडले जातील. प्रत्यक्ष उमेदवार निवडीची प्रक्रिया सुरू झालेली नसली तरी, राज्य स्तरावर प्राथमिक चाळणी लावण्याचे काम केले जात आहे. २२ जानेवारीनंतर भाजपचे केंद्रीय नेते प्रदेश भाजपकडून याद्या मागवतील. त्यानंतर खरा खेळ सुरू होईल. रामलल्ला नव्या मंदिरामध्ये स्थानापन्न होईपर्यंत भाजप रामाचा जप करत राहील.

काँग्रेसला- विशेषतः पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंना- ह्यइंडियाह्लच्या घटक पक्षांशी समन्वय आणि काँग्रेसच्या जागांची पक्षांतर्गत चाचपणी अशी दोन्ही गोष्टी एकाच वेळी कराव्या लागत आहेत. या दोन्हीला समांतर राहुल गांधींच्या ह्यभारत जोडोह्ल यात्रेचा दुसरा टप्पाही सुरू होईल. भाजप राम मंदिरातून तर काँग्रेस ह्यभारत न्याय यात्रेह्लतून निवडणुकीसाठी वातावरण निमिती करू पाहात आहे. ही यात्रा पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, बिहार या राज्यांतून प्रवास करणार असली तरी तिथे काँग्रेस कमीत कमी जागा लढवेल. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस फक्त दोन जागा सोडेल. वास्तविक, या दोन जागा परंपरागत काँग्रेसच्याच आहेत. माकप-काँग्रेस एकत्र लढले तर काँग्रेसच्या पदरात अधिक जागा येतील. उत्तर प्रदेशात समाजवादी पक्षाने सुमारे ६५ जागा लढवण्याचा निर्धार केला असल्यामुळे काँग्रेसला जास्तीत जास्त १५ जागा मिळतील. बिहारमध्ये ४-५ जागांवर समाधान मानावे लागेल. महाराष्ट्रामध्ये १८-२१ जागा वाटयाला येऊ शकतील. राहुल गांधींची यात्रा राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात यादेखील राज्यांतून जाणार असली तरी २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला एकतफी यश मिळाले होते. आत्ताही विधानसभा निवडणुकीत ही सगळी राज्ये भाजपने काबीज केली आहेत. कर्नाटक व तेलंगणामध्ये यात्रेचा राजकीय फायदा झाला तसा इथे मिळण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे काँग्रेसच्या जागांमध्ये थोडीफार वाढ झाली तरी यात्रा यशस्वी झाली असे म्हणता येईल!

**भागा वरखडे**

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने चारशेहून अधिक जागा लढवल्या होत्या, या वेळी काँग्रेस २५०-२५५ जागा लढवेल असे सांगितले जात आहे. तसे झाले तर ह्यइंडियाह्लतील घटक पक्षांना जागावाटपात झुकते माप देण्याची काँग्रेसची तयारी असल्याचे दिसते. पंजाब काँग्रेसचा स्वतंत्र लढण्याचा हेका केंद्रीय स्तरावर मान्य होण्याची शक्यता नाही. त्यामुळे दिल्ली, पंजाब आणि गुजरातमध्ये काँग्रेस ह्यआपह्लशी जागांच्या वाटाघाटी करू शकेल. अरुणाचल प्रदेश वगैरे काही राज्यांमध्ये जागा लढवण्याचे ह्यसपह्लने ठरवले असले तरी, प्रत्यक्षात जागावाटपाची चर्चा सुरू होईल तेव्हा ह्यइंडियाह्लतील सर्वच प्रादेशिक पक्ष तडजोड करतील असे दिसते. काँग्रेसने पक्षांतर्गत चर्चेचा पहिला टप्पा पूर्ण केला आहे. मुकुल वासनिक यांच्या समितीने राज्या-राज्यांतील काँग्रेसला अपेक्षित असलेल्या जागांची चाचपणी केलेली आहे. प्रदेश काँग्रेसच्या नेत्यांनी वासनिक समितीला जागावाटपांच्या शक्या-शक्यतेचा अहवाल दिलेला आहे. या समितीने चार दिवसांपूवी खरगेंशी सविस्तर चर्चाही केलेली आहे. त्यामुळे ह्यइंडियाह्लतील घटक पक्षांशी चर्चा करताना कोणत्या जागांचा आग्रह धरायचा याची माहिती खरगे व राहुल गांधींकडे उपलब्ध आहे. पुढील दोन आठवडयांमध्ये ह्यइंडियाह्लच्या जागावाटपांचे चित्र स्पष्ट होऊ शकेल. दिल्लीत मुख्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत खरगेंनी, घटक पक्षांशी लवकरात लवकर जागावाटपाचा पेच सोडवला जाईल असे स्पष्ट केले आहे. प्रदेश काँग्रेसच्या नेत्यांना संभाव्य उमेदवारांची यादी तयार करण्यास सांगितले आहे. काँग्रेस सर्व मतदारसंघांमध्ये जागा लढणार नसला तरी वाटाघाटीमध्ये मतदारसंघांची अदलाबदल होण्याची शक्यता असल्याने किमान पाचशे लोकसभा मतदारसंघांमध्ये निरीक्षक पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. १४ जानेवारी रोजी मणिपूरमधून भारत जोडो न्याय यात्रा निघेल. मग, काँग्रेसकडून जागावाटपाच्या चर्चेला गती दिली जाईल. तोपर्यंत आढावा-अंदाज घेण्याचे काम होत राहील.

# घरात एखादी मुलगी असती तर ...

**(भाग ४)**

रडता रडता अचानक कावेरी हसु लागली. जोरजोरात हसू लागली . बायका घाबरून गेल्या.आई, ती मधुमती नक्की कोण आहे? आपली कुणी नातेवाईक आहे का? अनिरुद्ध मी पण तोच विचार करतेय पण काही कळत नाही. एवढ्यात जयदेव येतात. काय कळत नाही? वसू अरे मधुमती बद्दल काय विचार करावा तेच कळत नाही मला. शेजारीपाजारी सुद्धा विचारू लागलेत मला की हि मुलगी कोण आहे म्हणून? काय उत्तरे द्यायची आपण वसू शेजार्यांना अशा प्रश्नाची उत्तरे द्याची नाहीत जयदेव बाबा, शेजार्यांना उत्तरे देण्याआधी आपल्याला तरी या प्रश्नांची उत्तरे माहिती आहेत का? अनिरुद्ध अरे पण मधुमती आपल्या घरी राहते याचा आपल्यला काही त्रास होतो का? ती एक चांगली मुलगी आहे . तिची आपल्याला मदतच होते ना जयदेव मग आजीच्या स्वप्नाचा काय अर्थ असेल? अनिरुद्ध 'काही कल्पना नाही जयदेव हो ना त्यांना रात्र झाली की भीती वाटायला लागते. आजकाल झोपत नाहीत वसू आता गणपतीला सगळेजण येतील. सारंग शर्मिष्ठा सुद्धा येणार आहेत . काय सांगायचे त्यांना ह्या सगळ्यांना मी उत्तरे देईन. मग तर झाले.आता कुठे ती? जयदेव ₹झोपाळ्यावर आहेत बाईसाहेब वसू वसू, मी आणि मधुमती जरा बाहेर जाऊन येतो. यावषी आपण मधुमतीच्या आवडीनुसार गणपतीची आरास करूया. संध्याकाळी कौस्तुभ त्याच्या चुलत आजोबांकडे म्हणजे आबासाहेबाकडे जातो. आबांना त्यांची वंशावळ पुन्हा नव्याने लिहायची होती . त्यासाठी त्यांनी कौस्तुभला बोलावून घेतले होते. रोजच्या स्वप्नामुळे सुमतीबाई मात्र हैराण झाल्या होत्या . रात्रीची झोप येईनाशी झाली होती. रात्रभर त्या जाग्याच असायच्या . त्यांना काहीतरी वेगळे वाटत होते मधुमतीचे या घरात येण्याचा आणि त्या स्वप्नाचा काही संबंध असेल का ?अनिरुद्ध आणि त्याची मैत्रीण रेवती गप्पा मारत होते . रेवती, तुला एक महत्त्वाची गोष्ट सांगायची आहे पण दोन अटी आहेत. एक म्हणजे ही गोष्ट कुणालाच सांगायची नाही आणि दुसरे म्हणजे अजिबात हसायचे नाही अति मान्य. पुढे बोल आमच्या घरी एक मुलगी आली आहे. मग त्यात कुणाला न सांगण्यासारखे काय आहे तू पुन्हा हसतेस रेवती . तुला विषयाचे गांभीर्यच नाही ₹₹बरं आता नाही हसणार. पुढे काय ?पुढे काय रेवती? ती मुलगी कोण आहे याचा शोध लागायला नको का ? नाव काय तिचे ?तिला नाव विचारले तर म्हणते माझे बारसेच झाले नाही. मला नाव नाही . तरी पण आम्ही तिला मधुमती या नावाने हाक मारतो . तिचे सगळे बोलणे कोड्यात टाकणारे असते कधी आली ती ?तीन महिने झाले असतील तिला येऊन आणि तू आत्ता सांगतोस? मागे तुला दोन तीनदा सांगण्याचा प्रयत्न केला पण तू माझी टिंगल उडवलीस . आठवतेय का ?आठवले. किती वर्षाची आहे ती ? काही त्रास देते का ?अठरा वीस वर्षाचीअसेल काही त्रास देत नाही. उलट तिचे आमच्या घरी खूप लाड सुरु आहेत . आई बाबा तिचे खुप लाड करतात. जणू ती आमच्याच घरची मुलगी आहे . परवचा आईने तिच्या साठी नवीन ड्रेस घेतले. पैंजण घेतले . व्वा! मज्जा चालू आहे मधुमतीची. तुझी आजी काय म्हणतेय ? आजीचे तर काही विचारू नकोस. आजी समोर मधुमती आली तर आजी सरळ म्हणते चालती हो माझं माज्या घरातून. मग मधुमती म्हणते , मला बोलावून घेतले आहे. मी जाणार नाही. हे माझे पण घर आहे . कमाल आहे अनिरुद्ध याच्या पुढे तर खरी कमाल आहे. आजीच्या स्वप्नात रोज तिच्या सासूबाई येतात. काय सांगतोस, काय?


खूप गोंधळ सूरु आहे आमच्या घरी . मला कधी कधी खूप वाईट वाटेते त्या मधुमती बद्दल. ती कोण आहे , तिचे आई वडील कोण आहेत, हरवले आहेत का ,

आणखी काही . मग तिचे नातेवाईक शोध घेत आहेत का . म्हणजे आम्ही सांभाळू तिला, काही कमी नाही पडू देणार . तरी पण .. ₹मी काही मदत करू का?

तू एकदा घरी येऊन तिच्याशी बोल. कदाचित ती तुला सांगेल मैत्रीण म्हणून मी येते दोन तीन दिवसांनी. गणपती दहा बारा दिवसावर आले होते . त्याची तयारी करण्यासाठी वासंती , तिची सून शर्मिष्ठा वसूकडे राहायला आले होते . मधुमतीबद्दल जयदेवने आधीच सांगितले होते . शर्मिष्ठा वसूकडे बर्याच दिवसांनी आली होती . त्यामुळे ती घरभर फिरत होती . अडगळीच्या खोलीत तिला एक जुना आकाशकंदील सापडतो . सप्तरंगी मण्यांचा . ती आकाशकंदील घेऊन वसूकडे येते . ₹काकू, आपण हा आकाशकंदील दिवाळीत लावायचा का?.

आपलाकडे आकाशकंदील लावत नाहीत ₹ वासंती ₹ का लावत नाही?'₹ते जयदेवला जाऊन विचार.


किती छान आहे हा. आपण दिवाळीत लावूया . मी विचारते जयदेवकाकांना ₹सप्तरंगी मण्यांचा आकाशकंदील वसूला तिच्या मलकापूरच्या मावशीने लग्नात दिला होता . आकाशकंदील लावण्यावरून जयदेव आणि वसूचे ऐन दिवाळीत भांडण झाले .



तेव्हापासून चिडून तिने हा आकाशकंदील अडगळीच्या खोलीत टाकून दिला होता .गणपतीचे दहा दिवस असेच उत्साहात , आनंदात गेले . त्यांनतर मात्र रेवती , कौस्तुभ आणि आबासाहेब तिघेजण मधुमतीचा शोध घेत होते . मधुमती नक्की कोण असावी , सुमतीबाईंच्या स्वप्नांचा अर्थ काय असावा याच्या शोधात होते . कुठून सुरुवात करायची हेच त्यांना कळत नव्हते. आबा, जानकीबाई म्हणजे तुमच्या आई ना रेवती हो . जानकी माज्या आईचे नाव' आबा मग आबा तुम्हला तुमच्या आईबद्दल काहीतरी माहिती असेल ना रेवती काहीतरी म्हणजे काय? आबा ₹म्हणजे त्यांचा स्वभाव, काही अशा आठवणी ज्या बद्दल राग, चिडचिड किंवा आनंद किंवा अशी एखादी गोष्ट जी त्यांनी कुणाला सांगितली नाही रेवती ₹आठवले. आपल्या घरात एक दागिन्याचा डबा आहे. खूप जुने दागिने आहेत ते . एकदा मी ते दागिने बघत होतो तर आई चिडली माज्यावर. म्हणाली की हे शापित दागिने आहेत कावेरी सारखे . हात सुद्धा लावू नको त्या दागिन्यांना. आबा हो त्या दागिन्यावरून आजी सुद्धा एकदा चिडली होती कौस्तुभ ₹कावेरी कोण? रेवती ₹कावेरीबद्दल आईकडून किंवा घरातील कोणाकडून कधीच काही समजले नाही. पण आपल्याला वंशावळीमधून माहिती मिळेल. आबा म्हणजे ते दागिने कावरीचे असणार रेवती शक्यता आहे. पण कावेरीच्या आणि मधुमतीचा काय संबंध? कौस्तुभ बरें. आबा त्याकाळापासून ते आजपर्यंत आपल्या घराण्याला ओळखणारे कुणी आहे का? म्हणजे नातेवाईक , नोकर माणसे राजा करवंदे नावाचा एक माणूस आहे. त्याची आपल्या चौकात त्याची वडापावची गाडी आहे. तो मागे सांगत होता की त्याचे पूर्वज आपल्या घरी कामाला होते म्हणजे नोकर माणसे म्हणून कामाला होती.

**पुणे वैंभव सौ. प्राजक्ता प्रणव देव**
**पिरंगुट , पुणे.मो.- ८७६६५८३९२**

# भेदिले सूर्यमंडळा !



भारतीय अवकाश-विज्ञानाची सौर-झेप ठरणाऱ्या आदित्य- एल १ या मोहिमेचे नाव शनिवारी सार्थ झाले! नावातील एल १ हा पृथ्वीच्या सूर्याभोवती फिरण्याच्या भ्रमणकक्षेच्या बाहेरचा, पण जिथून पृथ्वी नेहमी समोरच राहील असा बिंदू. त्या ह्यएल १ह्ल भोवती- म्हणजे पृथ्वीपासून १५ लाख किलोमीटर अंतरावर फिरण्याचा कळीचा टप्पा या मोहिमेने यशस्वीरीत्या गाठला. ह्यआदित्य- एल १ मोहिमेतला महत्त्वाचा भाग म्हणजे सूर्याच्या बाह्यावरणाचा अभ्यास करण्यासाठी भारतीय शास्त्रज्ञांनी साकारलेली वेधशाळा-उपकरणे सतत सूर्याच्या समोर ठेवणारा सुमारे २४४ किलो वजनाचा उपग्रह. तो आता काम करू लागेल. ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपण यानाच्या (पीएसएलव्ही) ३६ व्या सुधारित आवृत्तीद्वारे हा उपग्रह सोडणाऱ्या भारतीय अवकाश संशोधन संस्थेला (इस्त्रो) या अंतराचे अप्रूप नाही, कारण इस्त्रोचे मंगलयान तर ४० कोटी किलोमीटपर्यंत पोहोचले होते. तसेच उपग्रहाच्या वजनाचेही काही कौतुक नाही, कारण इस्त्रोनेच डिसेंबर २०१८ मध्ये गयानातील अवकाश-प्रक्षेपक तळावरून सोडलेला तब्बल ५४४२ किलो वजनाचा जीसॅट-११ हा उपग्रह आता भूस्थिर अवस्थेत कार्यरत आहेच. तेव्हा ह्यआदित्य-एल १ह्लच्या प्रवासाचा टप्पा संपल्याचे समाधान सर्वानाच असले तरी खरी उत्कंठा आहे ती पुढल्या साधारण तीन महिन्यांनी सूर्याची कोणती माहिती मिळू लागणार, याची. ह्यआदित्य- एल १ह्लच्या वेधशाळा-उपकरणांचे काम तोवर सुरू झालेले असेल.

हे काम महत्त्वाचे. अमेरिकी अंतराळ-वेध संस्था असलेल्या ह्यनासाह्लच्या संकेतस्थळावरील उल्लेखानुसार ह्यमूलभूतह्ल- म्हणूनच महत्त्वाचे. सूर्याच्या बाहेरचा थर म्हणजे प्रकाशावरण हा ६००० अंश सेल्सिअस इतका तप्त आहे. आपल्याला दिसणारा प्रकाश येतो तो या थरातून, पण न दिसणारा अवरक्त प्रकाशही याच थरातून येतो. या प्रकाशावरणाच्या बाहेरचा थर म्हणजे वर्ण-आवरण आणि त्याहूनही उंचावर लाखो अंश सेल्सिअस तापमान असलेला अतितप्त किरीट (इंग्रजीत ह्यकरोनाह्ल!) अशी सूर्याच्या बाह्यावरणाची रचना आहे. आपल्याकडच्या शहरांमध्ये हल्ली रुळलेली चहापेक्षा किटली गरमह्ल अशी एक म्हण आठवून पाहा- अक्षरशः तशी सूर्याची गत आहे. सूर्याच्या आतील थरांपेक्षा बाह्यावरण आणि त्यातही या आवरणाचा किरीट जास्त गरम आहे. तोही किती? तर सुमारे ११ लाख अंश सेल्सियस! इतकी उष्णता येते कुठून? शास्त्रीय भाषेतच विचारायचे तर, अतिरिक्त ऊष्णता प्रदान करणारा ऊर्जा स्त्रोत कोणता? याचे उत्तर मात्र अद्याप मानवाला मिळालेले नाही. ते उत्तर शोधण्याची दिशा कदाचित, आदित्य-एल १च्या कामातून मिळू शकेल. त्यातून अनेकपरींचे नवे प्रश्नही नक्की उद्भवतील.. उदाहरणार्थ, सूर्याचीच ह्यतापमानवाढ होते आहे का, यासारखा प्रश्न. सूर्याच्या बाह्यावरणातल्या ज्या किरीटाचा अभ्यास आदित्य- एल १ करणार आहे, त्याच किरीटातून पृथ्वीच्या पर्यावरणासाठी- जीवसृष्टीसाठी प्राणघातक ठरू शकणाऱ्या अज्ञात किरणांचे उत्सर्जनही होत असते. सध्या त्या किरणोत्साराचे सोयरसुतक आपणा पृथ्वीवासीयांना नाही, कारण अद्याप तरी आपले वातावरण त्या किरणांना बाहेरच्या बाहेर थोपवून धरण्याइतके सशक्त आहे. पण हे वातावरण अशक्त होत जाणार अशी स्थिती असताना सौर-किरीटातल्या त्या घातक किरणोत्साराचे प्रमाण किती, याचाही वेध भारतीय शास्त्रज्ञांना घेता येऊ शकतो.

आदित्य- एल १ वरची उपकरणे सन २०२५ पर्यंत सूर्याचा सातत्याने वेध घेऊन विविध प्रकारची विदा पाठवत राहातील. पुढले काम अवकाशाचा अभ्यास करणाऱ्या भौतिकशास्त्रज्ञांचे आणि गणितज्ञांचे. त्या ह्ययशह्ल कधी मिळेल, कुणाला मिळेल, हे नाही सांगता येत. पण अभ्यास तर सुरू झाला आहे. एखाद्या दर्यावदी खलाशाने अज्ञात बेटावर नांगर टाकावा आणि पुढला भूप्रदेश पालथा घालण्यासाठी उतरावे, त्या टप्प्यावर आत्ता आपण आहोत. हे कबूल की, याच एल-१ बिंदूभोवती सध्या युरोपीय संघ आणि अमेरिका यांनी संयुक्तपणे आखलेल्या दोन मोहिमांचे उपग्रह फिरताहेत. पण त्यांच्या अभ्यासाची वाट निराळी आहे, आपली निराळी. अवकाश सर्वाचेच असल्याने आणखीही अभ्यास होत राहातील, विविध देशांत या अभ्यासांचे आदान-प्रदानही होईल, तेव्हा सूर्याच्या ऊष्णतामंडलाचा रहस्यभेद शक्य होईल आणि मग तेव्हा ह्यभेदिले सूयर्मंडळाह्ल असेही म्हणता येईल! सध्या आपण सूर्याचा शोधाचा प्रारंभ केलेला आहे, ही जमेची बाजू.

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चिंचवड विधानसभा अध्यक्ष सागर मधुकर चिंचवडे यांच्या

# जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन आमदार रोहित पवार यांच्या हस्ते

**पुणे :** सागर मधुकर चिंचवडे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन आमदार रोहित पवार यांच्या हस्ते झाले यावेळी शहर अध्यक्ष तुषार कामठे आणि प्रदेश प्रवक्ते रविकांत वरपे उपस्तिथ होते.

रोहित पवार यावेळी म्हणाले की पिंपरी चिंचवडचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी निर्णायक भूमिका जर कोणी बजावलीअसेल तर ती भूमिका बजावणारे आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब हेच आहेत.

मागील काळात साहेब केंद्रीय मंत्री असताना जेएनएनयुआर एम प्रकल्पांतर्गत 3500 हजार कोटी रकमेची तरतूद साहेबांनी पिंपरी चिंचवड शहरासाठी उपलब्ध करून दिली.

या भरीव निधीमुळेच पिंपरी चिंचवड शहरात आज अस्तित्वात असलेले उड्डाणपूल, प्रमुख रस्ते,उद्याने,दवाखाने, विविध सांस्कृतिक कार्यक्रम होण्यासाठी आवश्यक असलेले नाट्यगृहे, अग्निशमन केंद्र,सायन्स पार्क, ऑटोक्लस्टर आहे.पण 2014 नंतर म्हणावी तशी प्रगती या शहराची झाली नाही.

सागर चिंचवडे म्हणाले की आज शहरातील स्थानिक भूमीपुत्रांना जी काही आर्थिक सुबत्ता मिळवता आली आहे त्या पाठीमागे माननीय पवार साहेब यांचे मागील 30 ते 35




वर्षाचे योगदान आहे हे शहरातील प्रत्येक पक्षातील प्रत्येक कार्यकर्त्याला मान्य करावेच लागेल.

प्रसंगी काही नियुक्त्या करण्यात आल्या.

1)चिंचवड विधानसभा कार्याध्यक्षपदी आशिष पांढरे 2) चिंचवड विधानसभा सरचिटणीस पदी अमित तलाठी 3) चिंचवड प्रभाग क्रमांक 17 अध्यक्षपदी नागेश सदावर्ते 4)चिंचवड प्रभाग क्रमांक 18 अध्यक्षपदी मयूर आरसुळ.

उदघाटन कार्यक्रम निमित्ताने आधार कार्ड दुरुस्ती अभियान 1 जानेवारी ते 3 जानेवारी 2024 आयोजित केले होते त्यादरम्यान 756 नागरिकांनी सहभाग नोंदवला तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते त्यादरम्यान 581 नागरिकांनी रक्तदान केले.

यावेळी राज्य विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष सुनील गव्हाणे,इंडिया आघाडी समन्वयक मानव काका कांबळे,मावळ लोकसभा निरीक्षक माधवी जोशी,राज्य डॉक्टर सेल प्रमुख डॉ सतीश कांबळे,मा नगरसेवक गणेश अण्णा भोंडवे, प्रदेश युवकचे प्रशांत सकपाळ,ओबीसी सेल अध्यक्ष विशाल जाधव,मा. नगरसेविका जनाबाई जाधव,महिला अध्यक्ष ज्योतीताई निंबाळकर,संगीताताई जाधव,पोलीस मित्र मालुसरे काका,संतोष माळी, अनिल भोसले,विवेक विधाते, अशोक तनपुरे, राहुल धनवे व पक्षाचे इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. आभार प्रदर्शन ॲड.निकिता सागर चिंचवडे यांनी केले.

## स्वच्छ आणि पारदर्शक पत्रकारीतेची समाजाला गरज - पोलीस अधीक्षक समीर शेख



**सातारा :** सध्याची पत्रकारिता अनेक संक्रमणातून जात आहे.साताऱ्यातील पत्रकारिता देशाला व राज्याला दिशा दर्शक आहे. पत्रकारांनी कोणत्याही प्रकारच्या दबावांना, अमिषांना बळी न पडता पत्रकारितेमध्ये पारदर्शकता आणि स्वच्छ स्वरुप आणणे आवश्यक असल्याचे मत सातारा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी व्यक्त केले.

जिल्हा माहिती कार्यालय व जिल्हा पत्रकार संघाच्यावतीने आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा स्मृतीदिन पत्रकार दिन येथील कृषी विभागाच्या बळीराजा सभागृहात साजरा करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला पुणे विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष आणि सातारा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष हरीष पाटणे, जिल्हा माहिती अधिकारी वर्षा पाटोळे, सातारा शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष विनोद कुलकर्णी, पत्रकार दीपक शिंदे, राहूल तपासे, सुजीत आंबेकर, सनी शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

जिल्हा पोलीस अधीक्षक समीर शेख म्हणाले, अलीकडच्या काळात शोध पत्रकारिता वाढण्याची आवश्यकता आहे. कोणतेही काम करताना त्याला सत्यशोधनाचा आधार मिळाला तर अधिक आनंद देणारे असते. पण, हे करत असताना अनेक अडचणी येत असतात. दबाव येत असतात. त्याला बळी न पडता पत्रकारांना त्यांचे काम करता आले पाहिजे, यासाठी तशा पध्दतीचे वातावरण तयार झाले पाहिजे. पत्रकारितेमध्ये व्यावसायिकता आली असली तरी सर्वांची स्थिती एकसारखी नाही. त्यामुळे नव्याने या क्षेत्रात येणाऱ्या लोकांना सोबत घेऊन जाण्याची व्यवस्थाही या पत्रकारितेमध्ये असली पाहिजे. पत्रकारीतेमध्ये गती, सत्यता आणि विश्वासाहायर्ता महत्वाची असते. या क्षेत्रात येणाऱ्या नवीन लोकांना प्रशिक्षणाची गरज असते त्यांच्यासाठी संघटनेने नवीन कोर्सेस सुरु केले तर पोलीसांमार्फत त्यांना सवतोपरी मदत केली जाईल.सोशल मीडिया चा चुकीचा वापर केला गेला तर गंभीर प्रकार होतात.त्यावर आळा बसणे आवश्यक आहे. अफवा पसरवणे हा गुन्हा असून अशा व्यक्तींवर कारवाई केली जाईल. साताऱ्यातील पत्रकारीतेला दर्जा असल्याने सोशल माध्यमांबाबत एक एसओपी तयार करावी लागणार असून त्याबाबत जिल्हा पत्रकार संघाने पुढाकार घ्यावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

पुणे विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष हरिष पाटणे म्हणाले, विभागीय समितीचा अध्यक्ष म्हणून अधिक सकारात्मक राहून जास्तीत जास्त पत्रकारांना अधिस्वीकृती देण्यासाठी प्रयत्न केले जातील. त्याबरोबर ही प्रक्रिया सोपी व्हावी आणि पत्रकार कल्याणाच्या विविध योजनांचा लाभ मोठ्या प्रमाणावर मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल. बाळाशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेचा लाभही जिल्ह्यातील पत्रकरांना मिळवून देण्याचा प्रयत्न पुढील तीन वर्षांच्या काळात विशेषत्वाने केला जाईल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा माहिती अधिकारी वर्षा पाटोळे यांनी केले. दीपक शिंदे यांनी सुत्रसंचालन तर जयंत लंगडे यांनी आभार मानले.

कार्यक्रमाला अधिस्वीकृती समितीचे सदस्य चंद्रसेन जाधव, ज्येष्ठ पत्रकार जीवनधर चव्हाण, दत्ता मर्ढेकर, अजित जगताप, केशव चव्हाण, अरुण जावळे, वैभव जाधव, विष्णू शिंदे यांच्यासह प्रिंट, इलेक्टॉनिक आणि डिजिटल मिडियाचे सर्व पत्रकार उपस्थित होते.

# महाबळेश्वरला संसर्ग; वेण्णा तलावात विष्ठा मिसळल्याने पर्यटक, स्थानिकांना आजारांची लागण

**पाचगणी :** महाबळेश्वरमध्ये अनेक पर्यटक घोड्यांवरुन रपेट मारण्याचा आनंद लुटतात. मात्र, या घोड्यांमुळे सध्या महाबळेश्वरमध्ये एक गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

महाबळेश्वरच्या वेण्णा तलावाजवळ पर्यटकांचे आकर्षण ठरणाऱ्या घोड्यांची विष्ठा महाबळेश्वरमध्ये वर्षानुवर्षे रोगराई पसरवत असल्याचे एका अभ्यासातून समोर झाले आहे. ही विष्ठा तलावाच्या पाण्यात मिसळत असल्याने अतिसार, अन्नविषबाधा, श्वसनाचा तीव्र संसर्ग, बुरशीजन्य संसर्ग आणि टायफॉइड असे आजार होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या अहवालामुळे संपूर्ण महाबळेश्वर व महाराष्ट्रातल्या महाबळेश्वर पाचगणी जाणाऱ्या पर्यटकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे

गोखले राज्यशास्त्र व अथर्शास्त्र संस्थेह्यच्या ह्यसेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंटह्य (सीएसडी) या संस्थेच्या माध्यमातून ह्यआरोग्य जोखीम मूल्यांकन संशोधन प्रकल्पह्य हाती घेण्यात आला होता. या प्रकल्पासाठी महाबळेश्वरची निवड करण्यात आली. संस्थेच्या



प्रा. डॉ. प्रीती मस्तकार यांच्या नेतृत्वाखाली निखिल अटक, दिशा सावंत, रोहिणी सातपुते, सूरज भोळे आणि विनित दुपारे यांनी या प्रकल्पावर काम केले. महाबळेश्वरमध्ये अनेक वर्षांपासून स्थानिक रहिवासी व पर्यटकांना अतिसार, अन्नविषबाधा, श्वसनाचा तीव्र संसर्ग, बुरशीजन्य संसर्ग आणि टायफॉइड या विकारांना समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याचे कारण शोधल्यानंतर घोड्यांची विष्ठा पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांत मिसळत असून, त्याद्वारे ती नागरिकांच्या पोटात जाऊन

**वेण्णा लेक परिसरातील पंचतारांकित हॉटेलचे सांडपाणी व ड्रेनेजचे पाणी याच तलावात सोडले जात असल्याची माहिती स्थानिक सांगतात त्यामुळे संबंधित हॉटेल्स वर एसटीपी चे कोणतेही प्लांट अवेलेबल नाहीत या हॉटेलमधून निघणारे सांडपाणी व ड्रेनेजचे पाणी याच तलावात सोडले जात आहेत त्यामुळे दूषित पाण्यात आणखीन भर होत आहे प्रदूषण विभाग व प्रदूषण मंडळाने व संबंधित नगरपालिकेने तलावाच्या अवतीभोवती असणाऱ्या सर्व हॉटेलची सांडपाण्याची तपासणी करावी अशी मागणी होत आहे.**

गंभीर आजार होत असल्याचे दिसून आले आहे

पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात वेण्णा नदीच्या उगम स्थान असणाऱ्या जागेवर वेण्णा लेक तलाव बांधला आहे मोठ्या प्रमाणात या लेख मध्ये पाण्याचा साठा होत असतो वसन वर्ष या परिसरात हॉर्स रायडिंग होत आहे इंग्रजांच्या काळापासून या परिसरात हॉर्स रायटिंग ला विशेष महत्त्व आहे सध्या या परिसरात हजारो घोडेस्वार परिसरात हॉर्स रायडिंग वर आपली उपजीविका करत असतात मात्र नव्याने आलेल्या या अहवालामुळे घोडे चालक-मालक यांच्यात भीतीचे वातावरण पसरले असून त्यांच्या रोजगार आणि उपजीविकेचा प्रश्न देखील या निमित्ताने निर्माण झाला आहे वेंना लेख तलावातून पाचगणी येथील प्राधिकरणाच्या माध्यमातून नळ पाणीपुरवठा केला जातो वर्षानुवर्ष या तलावातून प्राधिकरणाच्या माध्यमातून नळ पाणीपुरवठा योजना संपूर्ण पाचगणी शहरासह परिसरात पाण्याचा पुरवठा केला जातोय मात्र नेमकी पाण्यात दूषितिकरण कशामुळे झाले याचा अहवाल भलेही गोखले इन्स्टिट्यूटने दिला असला तरी याच तलावातील पाण्यात परिसरातील असणाऱ्या पंचतारांकित हॉटेलचे ड्रेनेज आणि सांडपाणी जात असल्याचे धक्कादायक माहिती याच लेख वरील घोडागाडी चालक-मालक व घोडेमालकांनी धक्कादायक माहिती समोर आणली आहे त्यामुळे तलावातील पाणी नेमके घोड्यांमुळे दूषित झाले आहे की अन्य काही कारणांमुळे याचा पुनर तपासणीचा अहवाल देखील सादर व्हावा अशी मागणी घोडे मालक-चालक यांनी केली आहे.

# मावळच्या विकासासाठी 'भारत विकास ग्रुप (बीव्हीजी)

## कंपनीने दिला आमदार सुनील शेळके यांच्या हातात हात इंद्रायणी भात पिक वाढीसाठी करणार विशेष प्रयत्न

**वडगाव मावळ : सतिश गाडे**

एक भारतीय उद्योजक आणि भारतातील सर्वात मोठी एकात्मिक सेवा कंपनी 'भारत विकास ग्रुप (बीव्हीजी) इंडिया लिमिटेड'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक हणमंतराव रामदास गायकवाड यांनी मावळचे लोकप्रिय आमदार सुनील शेळके यांची त्याच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली.

या दोघांमध्ये साधारणता तीन ते साडेतीन तास चर्चा झाली या चर्चेत मावळ मधील तरुणांच्या हाताला रोजगार तसेच कंपनी स्वच्छता राखण्याच्या कामापासून ते औषध उत्पादक होणे, तत्काळ सेवा पुरवणे, घन कचरा व्यवस्थापन, अशा अनेक कामांबाबत चर्चा झाली .

'भारत विकास'ग्रुप ने अनेक समाजोपयोगी कामे केली आहेत . त्यांनी महाराष्ट्र धरून तीन राज्यांत १७०० रुग्णवाहिका चालू केल्या आणि १०८ या क्रमांकावर फोन केल्यावर २० मिनिटांत रुग्णवाहिका मिळण्याची सोय केली. महागड्या रासायनिक पिकांऐवजी, जास्त पीक मिळवण्यासाठी आणि कीड काढण्यासाठी त्यांनी संशोधनपूर्वक ॲग्रो सेफ, ॲग्रो मॅजिक आणि ॲग्रो न्यूट्री ही हर्बल उत्पादने काढून, कोल्हापूर, औरंगाबाद, पुणे, सातारा, जालना, लातूर, सोलापूर जिल्ह्यात ढोबळी मिरची, भोपळा, आले, डाळिंबे, मिरची, क्रिसेन्थम फुले, पपई, कपाशी या पिकांचा आकार टपोरा केला आणि उत्पादन वाढवले.

### मावळात मोठ्या प्रमाणात भात शेती

याविषयी आमदार सुनील शेळके यांना तळमळ असल्याने आपल्या तालुक्यात मोठ्या प्रमाणात भात शेती केली जाते याचे उत्पन्न कसे वाढेल यातून शेतकऱ्यांना जास्त आर्थिक फायदा कसा होईल याचा विचार करून आमदार शेळके, सहकार महषी माऊली



दाभाडे यांच्या समवेत चर्चा करून सेंद्रिय पद्तीने भात शेती कशी केली जाईल यासाठी तालुक्यातील दोन ते तीन गावे दत्तक घेणार असल्याचे 'भारत विकास ग्रुप (बीव्हीजी) इंडिया लिमिटेड'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक हणमंतराव रामदास गायकवाड यांनी सांगितले

त्याचप्रमाणे तालुक्यात असणाऱ्या भाकड जनावरांसाठी नवीन संजीवनी देणारी उत्पादने आपल्याकडे असल्याने त्याचा देखील तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार असल्याचे गायकवाड यांनी सांगितले .

यावेळी बोलताना आमदार सुनील शेळके म्हणाले मावळ तालुक्यामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये स्थानिक भूमिपुत्रांना रोजगाराची संधी कशी उपलब्ध करून देता येईल , शेती मध्ये पिकाचे उत्पन्न कसे वाढवता येईल ,आपल्या शेतीला जोडव्यवसाय असणाऱ्या दुधाच्या व्यवसायात उत्पन्न कसे वाढवता येईल आणि आरोग्या संदर्भात देखील काही आपल्या तालुक्याला त्यांचा कंपनीची मदत घेता येईल का अशा विविध विषयांवर आज चर्चा झाली यावेळी (बीव्हीजी)ग्रुप आपल्याबरोबर काम करण्यास तयार झाल्याने त्यांचे मनापासून आभार मानतो

# सेवाभावी वृत्तीने दिलेल्या दानातूनच अद्यावत शैक्षणिक संस्था उभ्या राहतील

## माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण




**वर्धनगड :** केंद्र आणि राज्य शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे शिक्षण क्षेत्राची परिस्थिती अत्यंत दैयनीय झाली आहे.शिक्षणाचा दर्जा सुमार झाला आहे. प्रधानमंत्रीच्या २०४७ पर्यन्त

आपला देश विकसित भारत करण्याच्या केवळ घोषणाबाजीने आपला देश विकसित भारत होणार नाही. सध्याच्या शासनाचे धोरण असेच राहिले तर शिक्षणाचा दर्जा सुधारणार नसून आपण जगाच्या स्पर्धेत टिकणार नाही.दरवषी दुप्पटीने होणाऱ्या पदवीधरांच्या हाताला काम आणि नोकऱ्या शासनाकडे आजमितीला नाहीत.म्हणूनच समाजातील सेवाभावी संस्था, मोठमोठे उद्योगपती किंवा ज्यांना मदत करायची आहे त्यांनी शिक्षणा साठी मदत करा ,तुमच्या सेवाभावी वृत्तीने दिलेल्या दानातूनच अद्यावत शैक्षणिक संस्था उभ्या राहतील असा विश्वास राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केला आहे.

पुसेगाव ता खटाव येथील सेवागिरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने उभारण्यात आलेल्या राधाकृष्णन इंग्लिश मिडीयम स्कुलच्या नूतन वास्तूच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.यावेळी मठाधिपती प पु सुंदरगिरी महाराज, दानशूर व्यक्तिमत्त्व अनिल द्विवेदी, संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेश जाधव, उपाध्यक्ष बाळासाहेब जाधव, सचिव मोहनराव जाधव, देवस्थान ट्रस्टचे चेअरमन रणधीर जाधव, विश्वस्त संतोष उर्फ बाळासाहेब जाधव, संचालक विश्वनाथ जाधव, सुभाषराव जाधव, लक्ष्मण जाधव, विलासराव जाधव, डॉ. सुभाष आगाशे, विष्णुपंत खटावकर, योगेश देशमुख, सूयर्कांत जाधव, ॲड. विजयराव कणसे, मानाजीकाका घाडगे, महेश नलवडे, राजेंद्र घाडगे, गावोगावचे सरपंच, उपसरपंच तसेच प्राचार्य सुधाकर माने, मुख्याध्यापिका हेमलता देशमुख, पालक, विद्याथी व शिक्षकवृंद उपस्थित होते.

डॉ. सुरेश जाधव म्हणाले,१९६५ साली या संस्थेची स्थापना झाली तेव्हापासून गावातील व भागातील विद्यार्थ्यांची जडणघडण करण्यासाठी या संस्थेतील प्रत्येक घटकाने प्रामाणिक प्रयत्न केल्याने आज विद्याथी विविध क्षेत्रात चांगल्या पदावर कार्यरत आहेत.अजूनही ही संस्था परिसरातील विद्यार्थ्यांना त्यांच्या ध्येयापर्यंत पोहचवण्यासाठी अविरत कष्ट करणार आहे, सध्या राज्यात अनेकांचे हात भ्रष्टाचाराने बरबटलेले आहेत पण आज या नूतन इमारतीचे उद्घाटन एक स्वच्छ कारभार करणाऱ्या अद्यापही कोणत्याही ईडी बीडी पासून कोसोदूर असलेल्या व्यक्ती कडून होत आहे याचा पुसेगाव परिसराला अभिमान आहे.

दरम्यान उपाध्यक्ष बाळासाहेब जाधव यांनी प्रास्ताविक केले. विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या तसेच या शाळेच्या गुणगौरव प्राप्त विद्यार्थ्यांना व पालकांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.सौ हेमलता देशमुख यांनी आभार मानले.

# नोकरदार महिलांसाठी जागरूकता अभियान शुभारंभ

**ठाणे :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने ठाणे महानगरपालिका आणि कॉज फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नोकरदार महिलांच्या सुरक्षेसाठी कायदेविषयक जागरूकता अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी, माजी महापौर मीनाक्षी शिंदे, उपायुक्त वर्षा दीक्षित, आरोग्य अधिकारी आणि विशाखा समितीच्या डॉ. राणी शिंदे, जिल्हा महिला बालविकास अधिकारी महेंद्र गायकवाड, रेखा हिरे, ॲड. संध्या जाधव, ॲड. वैशाली रोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

सुरक्षित शहर होण्यासाठी सर्व नोकरदार महिला यांच्या सुरक्षेबाबत कॉज फाऊंडेशन कार्यरत आहे. कामाच्या ठिकाणी लैंगिक-शोषण झाल्यास अगर कौटुंबिक हिंसाचार झाल्यास सुरक्षित महिला (आयसीसी)ह्य योजनेंतर्गत, महिलांना मदक उपलब्ध करून देण्यासाठी या अभियानाची माहिती ठाणे जिल्ह्यातील प्रत्येक शासकीय, अशासकीय आस्थापनांपर्यंत पोहोचवणे हे या अभियानाचे प्रयोजन असल्याचे कॉज फाऊंडेशनच्या संचालिका कल्पना जितेश मोरे यांनी सांगितले. कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात झालेल्या या मार्गदर्शन कार्यक्रमात पालिकेतील महिला कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. कॉज फाऊंडेशनचे अध्यक्ष जितेश मोरे यांनी आभार प्रदर्शन केले.

# नारायणगाव येथे जितेंद्र आव्हाड यांच्या पुतळ्याचे दहन

## सकल हिंदू समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन





**नारायणगाव :** नारायणगाव येथे सकल हिंदू समाजाच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाचे नेते आमदार जितेंद्र आव्हाड यांचा आज सायंकाळी पुतळा दहन करण्यात आला.

प्रभू श्रीरामांच्या विषयी वादग्रस्त विधान केल्याच्या निषेधार्थ नारायणगाव (ता. जुन्नर) येथील एस.टी. बस स्थानकासमोर सकल हिंदू समाजाच्या वतीने या घटनेचा निषेध करत जितेंद्र आव्हाड यांच्या प्रतिमेला जोडे मारून तसेच प्रतिमेचे दहन करून त्यांचा निषेध करण्यात आला. याप्रसंगी नारायणगाव व परिसरातील युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बजरंग दलाचे माजी जिल्हा संयोजक नामदेव खैरे, एडवोकेट राजेंद्र कोल्हे, आशिष माळवदकर, उमेश अवचट यांनी जितेंद्र आव्हाड यांच्यावर टीका करत आपले मनोगत व्यक्त केले. नारायणगाव पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस उपनिरीक्षक सनील धनवे व पोलीस कमर्चारी बंदोबस्तासाठी उपस्थित होते. यावेळी तीव्र भाषेत जितेंद्र आव्हाड यांच्या निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या. या निषेध आंदोलनामुळे नारायणगाव बस स्थानक परिसरात काही काळ वाहतूक ठप्प झाली होती.

# खरी मनःशांती आणि समाधान हे अध्यात्मातूनच मिळते - आमदार दिलिप मोहिते पाटील

**राजगुरूनगर :** पराकोटीचा वाढलेला उपभोगवाद हा मनाला शांतता देणारा नसून, खरी मनःशांती आणि समाधान हे अध्यात्मातूनच मिळते. असे प्रतिपादन आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी येथे केले. ते येथील ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण मंडळ आणि समस्त ग्रामस्थ मंडळी राजगुरुनगर यांच्या वतीने आयोजीत अखंड हरिनाम सप्ताहाच्या जागराच्या किर्तन समारोपप्रसंगी बोलत होते.





यावेळी व्यासपिठावर ह.भ.प. प्रेमानंद महाराज आंबेकर (संगमनेर), ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण मंडळाचे अध्यक्ष शांताराम घुमटकर , विश्वस्त तथा राजगुरुनगरचे माजी सरपंच प्रदीप कासवा, जिल्हा परिषद अध्यक्षा निर्मलाताई पानसरे, राजगुरुनगर बँकेचे उपाध्यक्ष अविनाश कहाणे, विनायक घुमटकर, जि. र. शिंदे (गुरुजी), नामदेव कहाणे, अनिल लांडगे, विलास कहाणे, विठ्ठल सांडभोर, विजय भालेकर, बाळासाहेब दौंडकर, अनिल कहाणे, मच्छिंद्र भालेकर, संभाजी थिगळे, बबन लाडके, सुदाम वेहळे, भिलाजी पाकळे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना मोहिते म्हणाले, हरिनाम सप्ताह म्हणजे सामाजिक ऐक्य आणि नामसाधना यांचा सहयोग असून येथे कोणतेही गंडेदोरे, बुवाबाजी, अंगारे-धुपारे असले प्रकार होत नाहीत तर नामस्मरणातून परमार्थ आणि चांगले वागण्याचा उपदेश अध्यात्मिक व सामाजीक दृष्टांतातुन दिला जातो. ज्ञानदेव- तुकाराम आदी संतापासून चालत आलेला ही परंपरा सप्ताहाच्या माध्यमातून अशीच तेवत राहो. असे सांगुन त्यांनी राजगुरुनगरचा हरीनाम सप्ताह गेली ४४ वर्ष व योग्य प्रथा परंपरांचे पालन व बारमाही ज्ञानेश्वरी पारायण करत योग्य पध्दतीने चालू ठेवला असून, संयोजकांचे काम प्रशंसनीय आहे. असेही ते म्हणाले.याप्रसंगी प्रेमानंद महाराज आंबेकर, शांताराम घुमटकर प्रदीप कासवा, अविनाश कहाणे, जि. र. शिंदे (गुरुजी), नामदेव कहाणे, अनिल कहाणे यांच्या हस्ते आमदार मोहिते यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन जी. र. शिंदे (गुरुजी) यांनी केले.

# द्वेषाचे राजकारण नाशाकडे नेते

## विचारवंत डॉ. राम पुनियानी यांचे आवाहन

**पुणे :** 'द्वेषाचे राजकारण नाशाकडे नेते! पाकिस्तान हे त्याचे उदाहरण आपल्या जवळचे आहे, हे विसरता कामा नये. त्यामुळे विविधतेत एकता मानणाऱ्या भारताला द्वेषाच्या मार्गाने नाशाकडे नेण्याचे प्रयत्न यशस्वी होवू देता कामा नयेत. प्रेम, सद्भावना वाढवणाऱ्या कार्यक्रमांना पाठिंबा दिला पाहिजे, 'असे आवाहन ज्येष्ठ विचारवंत डॉ. राम पुनियानी यांनी रविवारी केले.

विचारवेध असोसिएशन, युवक क्रांती दल आणि महाराष्ट्र गांधी स्मारक निधी यांच्या वतीने आयोजित विचारवेध संमेलनातील दुसऱ्या दिवशीच्या सत्रांना ७ जानेवारी रोजी सकाळी गांधी भवन येथे प्रारंभ झाला. यावेळी डॉ. राम पुनियानी बोलत होते.

डॉ. पुनियानी म्हणाले, 'आधीच्या लढाया टोळ्यांमधील, राजा राजांमधील, सत्तांमधील असायच्या. तरीही आज तो इतिहास बदलताना त्यांना हिंदू- मुस्लीम लढायांचे रुप दिले जात आहे. भाजप सत्तेवर आल्यावर हे प्रयत्न वाढले. या लढायांकडे धर्माच्या चष्म्यातून पाहिले जात आहे. द्वेष वाढविण्यासाठी हा प्रचार वाढविला जात आहे. भारतीय संस्कृती ही बंधुभाव, सद्भाव मानणारी 'मिली जुली' अशी संस्कृती आहे. भारतीय आणि भारताबाहेरील पदार्थांचा मिलाफ झालेला आहे. अनेक शब्द, पेहराव इथे स्वीकारले आहेत. हिंदी सिनेमातील सुंदर भजने लिहिणाऱ्या, गाणाऱ्या नावात मुस्लीम गायक, कलाकार आहेत. त्यांना आपण भारतीय म्हणूनच ओळखतो'.

'धर्माच्या नावावर द्वेष वाढविला जात आहे. संघाच्या शाखेपासून सोशल मीडियापर्यंत जाणीवपूर्वक या गोष्टी होत आहेत. प्रत्यक्षात भारत हा विविधतेत आनंद मानणारा देश आहे. भारतात बाहेरुन विविध लोक येत राहिले आहेत.भारतीय स्वातंत्र्य लढ्यात हिंदू मुस्लिम आणि सर्व जण एकत्रित लढत होते. धर्माच्या नावावर लढणारे मात्र स्वातंत्र्य लढ्यात नव्हते. आपण मिळवलेले स्वातंत्र्य आपल्याला जपायचे आहे. म्हणून इथून पुढे संवैधानिक मूल्य रक्षणासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत',असेही डॉ. राम पुनियानी म्हणाले.

# मारहाणीच्या प्रयत्नांना प्रभावी उत्तर द्या : निरंजन टकले

**पुणे :** निरंजन टकले म्हणाले, 'संघापासून लोकशाहीला धोका आहे. बनारस हिंदू विद्यापिठातील विद्यार्थ्यांनी केलेला सामूहिक बलात्कार हा राजकीय हत्यार म्हणून केलेला बलात्कार आहे. सावरकरांचे जाणीवपूर्वक उदात्तीकरण केले जात आहे. संवेदनशीलता संपवली जात आहे'.

'पुणे विद्यापीठात विद्यार्थ्यांना मारहाण होते. पोलिसांची गाडी कायमस्वरूपी ठेवली जाते. हे विद्यापीठ आहे की दगडी चाळ? असा प्रश्न टकले यांनी विचारला. आजच्या कालानुरुप आणि कल्पक आंदोलने केली पाहिजे. मारहाणीच्या प्रयत्नांना प्रभावी उत्तर दिले पाहिजे. कारण आपण गांधीजींचे वारस आहोत, तसेच भगतसिंग यांचेही वारस आहोत. युरोप, कॅनडात खून करण्याचे प्रयत्न होत असतील तर भारतात खूनाचे प्रयत्न झाले नसतील का ? या मुद्यावर पुन्हा न्या.लोया यांच्या संशयास्पद मृत्यूकडे पाहिले पाहिजे', असेही ते म्हणाले.

'सावित्रीच्या लेकी ' पुरस्कार

या संमेलनात भारत जोडो आंदोलनाच्या वतीने निरंजन टकले यांच्या हस्ते 'सावित्रीच्या लेकी' पुरस्कार मंगला पाटील, अरुंधती गडाळे, प्रतिभा भोसले, त्रिवेणी गव्हाळे यांना देण्यात आला.यावेळी आनंद करंदीकर, हरीश सदानी उपस्थित होते.

दोन दिवस विचारांचा वेध आणि वेधक विचार

'लोकशाहीच्या संरक्षणासाठी लोकांचा जाहीरनामा' ही या संमेलनाची संकल्पना असून विविध आंदोलनातील कार्यकर्ते तसेच विचारवंत सहभागी झाले. यावषी लोकसभा निवडणूक होण्याची शक्यता असल्याने नागरिकांना पुरेशा माहितीवर आधारित, विचारपूर्वक आणि निर्भय मतदान करता येणे, हे लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी आवश्यक आहे. लोकशाही रक्षणाच्या तातडीच्या प्रश्नावर विचार करण्यासाठी हे विचारवेध संमेलन आयोजित करण्यात आले . ६ जानेवारी रोजी पहिल्या दिवशी योगेंद्र यादव, तुषार गांधी आदींनी तर डॉ. राम पुनियानी, डॉ.कुमार सप्तषी, निरंजन टकले, हरीष सदानी, सुनीती सु.र., अजित रानडे, संदीप बर्वे आणि अन्य मान्यवरांनी दुसऱ्या दिवशी विविध सत्रात मार्गदर्शन केले.

# महाराजा यशवंतराव होळकर (प्रथम) यांचा राज्याभिषेक दिन व गड संवर्धन भूमिपूजन सोहळा संपन्न

**राजगुरूनगर :** आज दि. ०६ जानेवारी रोजी किल्ले वाफगाव (ता. खेड) येथे महाराजा यशवंतराव होळकर (प्रथम) यांचा राज्याभिषेक दिन व गड संवर्धन भूमिपूजन सोहळा गजी नृत्य, मर्दानी खेळ, ढोल वादन व भंडाऱ्याच्या उधळणीने मोठ्या उत्साहात पार पडला. या वषी सर्व अठरा पगड जातीच्या लोक प्रतिनिधींना राज्याभिषेकाची संधी देण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी यशवंतराव महाराजांवर व होळकर घराण्यावर प्रेम करणारे समाज बांधव व भगिनी, अनेक ऐतिहासिक घराण्यांचे वंशज, सामाजिक राजकीय क्षेत्रात कार्यरत असलेले मान्यवर, प्रशासकीय अधिकारी, अठरा पगड जातीतील विविध संघटना, इतिहास प्रेमी मोठ्या संख्येने राज्य व देशभरातून उपस्थित होते. भूमीपूजनासाठी केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले, सुनीलजी देवधर, खेडचे आमदार दिलीपराव मोहिते पाटील, माजी मंत्री आमदार प्रकाश आवाडे, माजी मंत्री अण्णासाहेब डांगे, लष्कराचे काही अधिकारी व अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



राजराजेश्वर चक्रवती सम्राट महाराजा यशवंतराव होळकर यांचे भारतीय इतिहासातील योगदान अव्दितीय आहे. जगभरात अजिंक्यक मानल्या जाणाऱ्या इंग्रजांचा त्यांनी अनेक वेळा पराभव केला. भारतीय स्वातंत्र्य लढ्याची बीजं लढवय्या मनात पेरली. राजस्थान, माळवा, पंजाब, दिल्ली इतक्या भल्या मोठ्या प्रदेशात महाराजांनी इंग्रजांविरुद्ध युद्धे लढली. भारतमातेच्या रक्षणासाठी आपसातील मतभेद विसरुन देशभरातील सर्व राजा महाराजांना एकत्र येण्याचे आवाहन केले. इंग्रज यशवंतराव महाराजांना भारताचा नेपोलिअन म्हणत. महाराजांशी बिनशर्त संधी करण्याची इंग्रजांची मानसिकता होती. मात्र महाराजा यशवंतराव होळकर यांना स्वतंत्र हिंदुस्थान हवा होता. हा इतिहास तरुणांना प्रेरणादायी आहे.

या पराक्रमी देशभक्त राजाचे जन्मस्थान असलेला वाफगावचा भुईकोट किल्ला सुभेदार मल्हारराव होळकर यांनी बांधून घेतला होता. पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या वास्तव्याने ही वास्तु पावन झाली आहे. अनेक ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार वाफगावचा किल्ला आज २५० वर्षांनंतर संवर्धित होत आहे हा आपल्या सर्वांसाठी एक ऐतिहासिक दिवस आहे. या साठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे त्यामुळे परिसराचा विकास होईल, ग्रामस्थांना रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील, पर्यटन वाढेल अशी भावना होळकर राजघराण्याचे वंशज भूषणसिंहराजे होळकर यांनी व्यक्त केली. त्यांच्याच नेतृत्त्वात 'होळकर राजपरिवारा' तर्फे राजराजेश्वर चक्रवती सम्राट महाराजा यशवंतराव होळकर यांच्या राज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन केले जाते.

# शेतकरी आंदोलनाच्या धर्तीवर हिट अँड रन विरोधात लढा द्याः बाबा कांबळे

**पिंपरी :** शेतकरी हिताच्या विरोधात निर्णय घेतल्यानंतर देशभरातील शेतकरी संतप्त होऊन रस्त्यावर उतरले होते. त्यांनी केंद्र सरकारविरोधात चिकाटीने लढा दिला. लाठ्या खाल्ल्या. त्यांच्या लढ्यापुढे सरकारला माघार घ्यावी लागली. शेतकऱ्यांची हीच चिकाटी पाहून त्यांच्याप्रमाणे हिट अँड रन विरोधात लढा द्यायला हवा. केंद्राने केलेला हिट अँड रनचा जुलमी कायदा माघार घ्यायला भाग पाडू, असे प्रतिपादन ऑटो, रिक्षा, टॅक्सी, ट्रक, टेम्पो बस फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष बाबा कांबळे यांनी केले.



केंद्र सरकारने हिट अँड रन प्रकरणी ३ जानेवारी पासून दिल्ली जंतर मंतर येथे बाबा कांबळे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनासाठी देशभरातील ऑटो, बस, ट्रक, टेम्पो ड्रायव्हर संघटनेचे प्रतिनिधी दिल्ली येथे दाखल झाले. आंदोलनाची ही लाट पंजाब मध्ये देखील पोचली. पंजाब मधील भवाणीगड पटियाला येथील ट्रक, टेम्पो चालकांनी दिवसभर रास्ता रोको आंदोलन केले. या वेळी आंदोलनात सहभागी होत बाबा कांबळे यांनी मार्गदर्शन केले.

केंद्र सरकारच्या विरोधात विविध मागण्यासाठी ऑटो, रिक्षा, टॅक्सी, ट्रक, टेम्पो बस चालक मालक आंदोलन करत आहेत. अपघात झाल्यास चालकाला दहा वर्षांची शिक्षा आणि ७ लाख रुपये दंड असलेला काळा कायदा सरकारने तात्काळ मागे घ्यावा. देशातील सर्व चालक आणि मालकांसाठी राष्ट्रीय कल्याण मंडळाची स्थापना करावी. त्याद्वारे सामाजिक सुरक्षा, आरोग्य सुविधा, मुलांना शिक्षणाच्या सुविधा आणि वृद्धापकाळात पेन्शन सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. राष्ट्रीय चालक आयोग स्थापन करावा. सरकारने देशभरात चालक दिन साजरा करावा. दिल्लीत चालकांसाठी राष्ट्रीय स्मारक बांधावे आदी मागण्यांसाठी बाबा कांबळे यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीत आंदोलन झाले.

महाराष्ट्रातील पिंपरी चिंचवड, पुणे आणि महाराष्ट्रातून ऑटो व ट्रक टेम्पो चालकांनी आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. संबधित आरटीओ कार्यालयावर आंदोलन करून पाठिंबा देण्यात आला आहे.पंजाबमध्ये देखील रास्ता रोको करण्यात आले. या आंदोलनात बाबा कांबळे सहभागी झाले होते. या वेळी त्यांनी आंदोलनकर्त्यांना मार्गदर्शन केले.

बाबा कांबळे म्हणाले की, हिट अँड रन प्रकरणी देशभरातील २५ कोटी चालक आंदोलन करत आहेत. काही जण आंदोलन बंद झाल्याची चुकीची माहिती देत आहेत. मात्र हे आंदोलन मागे हटलेले नाही. देशभरात आंदोलन सुरूच आहे. केंद्र सरकार देशभरातील २५ कोटी वाहनचालकांवर अन्याय करत असून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र देशभरातील चालकांच्या जोरावर होणाऱ्या अन्यायावर मात करून लढा जिंकू असा निर्धार बाबा कांबळे यांनी व्यक्त केला.

# स्वच्छ पाणी, सांडपाणी तंत्रज्ञान आणि अक्षय ऊर्जा प्रदर्शनाचे आयोजन

**पुणे :** स्वच्छ पाण्याची गरज लक्षात घेऊन पाणी व सांडपाण्याविषयी आधुनिक तंत्रज्ञान आणि अक्षय ऊर्जा प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. पिंपरी-चिंचवड येथील ऑटो क्लस्टर एक्झिबिशन सेंटर येथे १० ते १२ जानेवारी रोजी ₹इंडिया वॉटर शो अँड रीन्यूएबल एनर्जी एक्स्पो₹ हे प्रदर्शन असणार आहे. या प्रदर्शनात प्रामुख्याने पाणी आणि सांडपाणी प्रक्रिया संयंत्र प्रणाली आणि तंत्रज्ञान, ओझोन निमिती प्रणाली, चाचणी उपकरणे, आरओ प्लांट्स, अल्कधमी पाणी, फिल्टर्स, बाष्पीभवन प्रणाली, रूफ टॉप सोलर, सौर पॅनेल सारखी अक्षय ऊर्जा उपकरणे पाहायला मिळणार आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे सहशहर अभियंता (पर्यावरण) संजय कुलकणी प्रदर्शनाचे उदघाटन करणार असल्याची माहिती आयोजक सादिक शेख आणि एस शंकर यांनी दिली.

INDIA WATER SHOW
WATER & WASTE WATER EXPO

प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी महावितरणचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांच्या हस्ते कॉन्फरन्सचे उदघाटन होणार आहे. या चर्चासत्रामध्ये शासनाचे नवीन सौर ऊर्जा धोरण आणि नियमांविषयीचे महावितरणचे अभियंता डॉ. संतोष पटनी यांचे मार्गदर्शन तर हायड्रोजन ऊर्जेचा परिचय मास्माचे माजी अध्यक्ष संजय कुलकणी हे करून देणार आहेत. यावेळी मास्माचे अध्यक्ष शशिकांत वाकडे व माजी अध्यक्ष रोहन उपासनी उपस्थित असणार आहेत.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, महाराष्ट्र सोलर मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन (मास्मा), सस्टेनेबिलिटी आणि एनर्जी प्रॅक्टिशनर्स असोसिएशन यांच्या सहकार्याने व मुंबईतील प्रोपल एंटरप्रायझेस यांच्यावतीने हे प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रासह इतर राज्यातील या क्षेत्रातील दिग्गज तज्ज्ञ, उत्पादक आणि विक्रेते या प्रदर्शनामध्ये सहभागी होणार आहेत. तर उत्पादने आणि सेवांची यावेळी प्रात्यक्षिके सादर होणार असून नवीन उत्पादनांचे आणि तंत्रज्ञानावर विविध तज्ञाचे मार्गदर्शन यावेळी मिळणार आहे.

लोकसंख्या झपाट्याने वाढत असताना पाण्याचा पुरवठा मर्यादित होत आहे. उद्योग, शेती आणि दैनंदिन वापरासाठी पाण्याचा अधिक वापर होत आहे. अशातच मोठ्या शहरांमध्ये सांडपाणी हे एक मौल्यवान स्त्रोत असू शकते. मर्यादित गोड्या पाण्याच्या पुरवठ्यावरील ताण कमी करण्याबरोबरच, सांडपाण्याचा पुनर्वापर केल्याने प्रवाह आणि तलावांची गुणवत्ता सुधारू शकते ज्यामुळे ते प्राप्त होणारे सांडपाणी कमी होते. सांडपाण्यावर पुन्हा दावा केला जाऊ शकतो आणि पीक आणि लँडस्केप सिंचन, भूजल पुनर्भरण किंवा मनोरंजक हेतूंसाठी पुन्हा वापरला जाऊ शकतो. त्यामुळे सांडपाणी क्षेत्रातील तसेच अक्षय ऊर्जा क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञानाचा प्रचार प्रसार करण्यासाठी या प्रदर्शनाचे आयोजन केले असल्याची माहिती आयोजक सादिक शेख आणि एस शंकर यांनी दिली.

# पक्षांतर्गत गटबाजीमुळे काँग्रेसचे पानिपत काय

## पराभूत उमेदवारांनी टोचले पक्षश्रेष्ठींचे कान

**भोपाळः** सरत्या वर्षाच्या अखेरीस झालेल्या विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम अर्थात यंत्राद्वारे मतदानामुळे काँग्रेसचे पानिपत झाल्याचा दावा राज्यातील ज्येष्ठ नेत्यांनी केला असला तरीही पराभूत उमेदवारांनी पक्षांतर्गत गटबाजी हे पक्षाच्या पराभवाचे एक प्रमुख कारण असल्याचे नमूद करीत पक्षश्रेष्ठींना घरचा आहेर दिला आहे. ही गटबाजी दूर करण्यासाठी लोकसभा निवडणुकीपूर्वीच आवश्यक पावले उचलण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

नोव्हेंबर २०२३ मध्ये भारतीय जनता पक्षाला पाणी पाजण्याच्या निर्धाराने विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या काँग्रेसला राज्यात मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. या निवडणुकीत २३० जागांपैकी भारतीय जनता पक्षाने १६३ जागांवर विजय मिळवला तर काँग्रेसला ६६ जागांवर समाधान मानावे लागले.

या निवडणूक निकालाचे विश्लेषण करण्यासाठी आणि पक्षाच्या पराभवाची कारणमीमांसा उलगडण्यासाठी काँग्रेसच्या वतीने येथील प्रदेश मुख्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत विशेषतः पराभूत झालेल्या उमेदवारांकडून आपल्या पराभवाच्या कारणांचा अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. अर्थातच, त्यापैकी बहुतांश जणांनी आपल्या पराभवाचे खापर ईव्हीएम मशीनवर फोडत आपल्या वरिष्ठ नेत्यांची री ओढली. मात्र, अनेक उमेदवारांनी पक्षांतर्गत गटबाजीमुळे आपला पराभव झाल्याचे अहवालात नमूद केले. आगामी लोकसभा निवडणुकीत या पराभवाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तातडीने कठोर पावले उचलण्याची आवश्यकताही त्यांनी पक्ष नेतृत्वासमोर व्यक्त केली.

# झोपलेल्या सरकारला जाग येत नाही

## शिवसेना नेते संजोग वाघेरेची शिंदे सरकारवर टीका




**वडगाव मावळ :** जनरल मोटर्स कंपनी बंद पडल्यानंतर त्यात काम करणाऱ्या सुमारे एक हजार कर्मचाऱ्यांचा रोजगार गेला आहे. जनरल मोटर्स प्लांट हुंडाई कंपनीने घेतला असून त्या कंपनीत जनरल मोटर्सच्या कामगारांचे पुनर्वसन करावे, या मागणीसाठी जनरल मोटर्सच्य कामगारांकडून साखळी उपोषण केले जात आहे.

या साखळी उपोषणाला आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी महापौर संजोग वाघेरे यांनी भेट देऊन पाठिंबा दिला. कामगार व त्यांचे कुटुंबीयांचे ९८ दिवसापासून आंदोलन सुरु आहे तरी या झोपलेल्या सरकारला जाग येत नाही ही शोकांतिका संजोग वाघेरे यांनी व्यक्त केली.

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व संजय राऊत यांच्याशी चर्चा करून कामगारांचा प्रश्न लवकरच मागी लावण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# पत्रकार दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने पत्रकारांचा सन्मान




**वडगाव मावळ :** पत्रकार दिनानिमित्त शनिवारी (दि. 6) मावळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने मराठी पत्रकारितेचे जनक, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

यावेळी मावळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष दत्तात्रय पडवळ, मावळ तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष विशाल वहिले, पुणे जिल्हा सरचिटणीस सुनिल शिंदे, जेष्ठ नागरिक सेल मावळ तालुका अध्यक्ष पांडुरंग दाभाडे, भरत राजीवडे, मावळ तालुका विद्याथी कॉग्रेस अक्षय मु-हे, माग्रा.प.सदस्य बारकुभाऊ ढोरे, नरेंद्र मु-हे, शंकर मोढवे, बाळासाहेब तुमकर, पंकज भामरे, श्रेयस भिडे, प्रणव ढोरे, राहिल तांबोळी आदी उपस्थित होते.

स्थानिक, जिल्हा, राज्य, देश तसेच जागतिक पातळीवरील समस्या आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवणाऱ्या व रचनात्मक उपक्रमांना यथायोग्य प्रसिद्धी देणाऱ्या, लोकशाहीचा वैचारिक कणा तसेच चौथा स्तंभ असलेल्या मावळ ग्रामीण पत्रकार संघातील पत्रकार बंधुंना सन्मानित करण्यात आले.

यावेळी जेष्ठ पत्रकार विजय सुराणा, ज्ञानेश्वर ठाकर, गणेश विनोदे, सचिन ठाकर, सचिन शिंदे, संकेत जगताप, संजय दंडेल, सतिश गाडे, प्रभाकर तुमकर,महादेव वाघमारे, योगेश घोडके, अभिषेक बोडके आदिंना सन्मानित करण्यात आले.